# महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद

## शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी (TAIT) परीक्षा २०२५

## प्रसिध्दीपत्रक (प्रेसनोट)

महाराष्ट्र शासनाच्या पत्र क्रमांक संकीर्ण २०२५/प्र.क्र.९२/टिएनटी-१, दि.२८/०२/२०२५ व मा. आयुक्त (शिक्षण), यांचे जा.क्र. आस्था-क/प्राथ १०६/टेट-३/वेप/२०२५/११९१, दि. १९/०३/२०२५ राजीच्या पत्रान्वये तसेच सदर परीक्षा शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग प्रानिमं १२२२/प्र.क्र.५४/का. १३-अ, दिनांक २१ नोव्हेंबर २०२२ नुसार शासनाने नेमलेल्या IBPS या संस्थेमार्फत महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या वतीने **"शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी (TAIT) परीक्षा २०२५"** चे आयोजन ऑनलाईन पद्धतीने **दिनांक २७/०५/२०२५ ते ३०/०५/२०२५ व दिनांक ०२/०६/२०२५ ते ०५/०६/२०२५** या कालावधीत राज्यातील २६ जिल्हांमध्ये एकूण ६० परीक्षा केंद्रांवर ८ दिवसामध्ये प्रतिदिन तीन सत्रात करण्यात आले होते. सदर परीक्षेस एकूण **२२८८०८** परीक्षार्थी / उमेदवारांनी नोंदणी केली होती. त्यापैकी परीक्षेस एकूण **२११३०८ उमेदवार** प्रविष्ठ झाले होते.

शासन शुध्दीपत्रक क्रमांक संकीर्ण-२०२२/प्र.क्र.१०६/टिएनटि-१, दिनांक ०२/०५/२०२५ अन्वये उमेदवारांनी व्यावसायिक अर्हता त्याचवेळीच्या संधीत उत्तीर्ण झाल्याचे गुणपत्रक वा अन्य वैध प्रमाणपत्र महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेकडे सदर व्यावसायिक परीक्षा (बी.एड./ डी.एल.एड.) उत्तीर्ण झाल्याच्या दिनांकापासून कमाल १ महिना कालावधीत सादर करणे अनिवार्य होते. वरील व्यावसायिक परीक्षांचा निकाल विविध संस्थांमार्फत वेगवेगळ्या वेळी लागत असल्याने शासन शुध्दीपत्रक दिनांक ०२/०५/२०२५ च्या अनुषंगाने TAIT - २०२५ परीक्षेचा निकाल लावण्यासाठी माहिती प्राप्त व एकत्रित होण्यास वेळ लागत आहे. तसेच दि. ०५/०८/२०२५ रोजी डी.एल.एड. निकाल प्रसिध्द करण्यात आला आहे. वरील परीक्षेत पात्र उमेद्वारांच्या निकालाच्या अनुषंगाने **"शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी (TAIT) परीक्षा २०२५"** च्या निकालाची कार्यवाही सुरु आहे व हा निकाल लवकरच महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल. त्यामुळे उमेदवारांनी/परीक्षार्थ्यांनी युट्युब चॅनेल्स व सोशल मिडिया प्लॅटफॉर्म द्वारे दिल्या जाणाऱ्या बातम्या/अफवांवर विश्वास न ठेवता महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या अधिकृत संकेतस्थळावर वेळोवेळी देण्यात येणाऱ्या सूचना व माहितीचे अवलोकन करावे. कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवून झालेल्या नुकसानीस उमेदवार / विद्यार्थी सर्वस्वी जबाबदार असतील याची नोंद घ्यावी.

**ठिकाण :** पुणे

**दिनांक :** ११/०८/२०२५

**(अनुराधा ओक)**

**आयुक्त**

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे – ०४